# मुंबई मेट्रो ३ चे काम सुस्साट

## मार्गावर ३० टक्के भुयारीकरण शिल्लक

**खास प्रतिनिधी ▸▸ मुंबई**

- पॅकेज ७ (मरोळनाका ते आरेस्थानक)आघाडीवर आहे.
- पॅकेजमध्ये ९७ टक्के बोगदा खणला
- १२ डिसेंबर २०१९ पर्यंत येथील १०० टक्के काम पूर्ण होणे अपेक्षित
- इतर पॅकेजमध्ये देखील भुयारीकरण प्रगतीपथावर
- एकूण३८.२५ किमी भुयारीकरणासाठी २७०३० रिंग्जचा उपयोग
- आतापर्यंत २३ भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण
- येत्या वर्षात उर्वरित ९ टप्पे पूर्ण होणे अपेक्षित



मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारा (एमएमआरसीएल) राबविल्या जाणाऱ्या मेट्रो मार्ग ३ मार्गावर ७० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले. दोन वर्षांच्या कालावधीत मेट्रोने हा टप्पा पूर्ण केला आहे. मेट्रो ३ या कुलाबा वांद्रे सिप्झ मार्गावर एकूण ५५ किमी भुयारीकरणापैकी ३८.२५ किमीचे भुयारीकरण करण्यात आले आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन, त्यांचे तांत्रिक सल्लागार आणि कंत्राटदार यांची अनेक पथकांकडून पॅकेजेसनुसार हे काम पूर्ण करण्यात आले आहे. आता येत्या काळात ३० टक्के भुयारीकरणाचे काम मॅरेथॉन वेळेत पूर्ण करण्याचे आव्हान एमएमआरसीएल) समोर आहे. मुंबईचा भूगर्भ हा अभियांत्रिकी दृष्टीकोनातून अतिशय आव्हानात्मक आहे. परंतु, हे सर्व अडथळे पार करत ७० टक्के भुयारीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. मेट्रो ३ मार्गावर एकूण ३३.५ किमी भूमिगत मार्गासाठी अप आणि डाऊन लाईन असे ५५ किमीचे भुयारीकरण करावे लागणार आहे. यापैकी ३८.२५ किमीचे भुयारीकरण झाले. मेट्रो ३ चे संपूर्ण भुयारीकरण ३२ टप्यात पूर्ण होणार असून आतापर्यंत २३ टप्प्यांत काम पूर्ण झाले आहे.

भुयारीकरणाचे काम पूर्ण करताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. परंतु, सर्व परिस्थितीला मेट्रो ३ च्या टीमने समर्थपणे तोंड देत हे यश मिळविल्याचा सार्थ अभिमान आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेत लक्षणीय बदल दिसून येतील, असा विश्वास एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी व्यक्त केला आहे. मेट्रो मार्गावर दररोज १७ लाख लोक रोज प्रवास करतील, ज्यामुळे रोजच्या ६.५ लाख वाहनफेऱ्या कमी होतील. त्यामुळे प्रदूषित वायूंचे प्रमाण प्रतिवर्षी २.६१ लाख मेट्रिक टन एवढे कमी होईल. या प्रकल्पांतर्गत ७० टक्के भुयारीकरण होणे म्हणजे या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीच्या दृष्टीने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. महाराष्ट्र शासन, कंत्राटदार आणि सल्लागारांची टीम व मुंबईकरांचे मी मनस्वी आभार मानते असेही त्यांनी सांगितले.